# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

Email ID : msboardnagpur@gmail.com          www.nagpureduboard.in


पत्र कमांक / नाविमं / प.मा. / 1318
दिनांक:– 28 / 04 / 2022

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषय:– मार्च–एप्रिल 2022 मध्ये आयोजित माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ.

संदर्भ:– 1. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं./परीक्षा–7/2149 दि. 27/04/2022.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, मार्च–एप्रिल 2022 मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

सहपत्र:–प्रकटनाची प्रत

प्रतिलिपी:–

1) सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3 शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.............................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्र क ट न

**विषय–** मार्च-एप्रिल २०२२ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याचे प्रस्ताव विभागीय मंडळांकडे सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १५ जानेवारी २०२२ पर्यंत देण्यात आली होती.

शासनाच्या दिनांक २६/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीच्या गुणांचे प्रस्ताव विदयार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यास दि.३१ मे २०२२ पर्यंत व शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.०६ जून २०२२ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे परिपूर्ण प्रस्ताव माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे निर्धारीत मुदतीत सादर करावयाचे आहेत. यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तरी मार्च-एप्रिल २०२२ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१०वी) प्रविष्ठ सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळाप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक २७/०४/२०२२